
Little Champs

# रवींद्रनाथ टागोरांच्या
# बालकविता



अनुवाद
पद्मिनी बिनीवाले

# रवींद्रनाथ टागोरांच्या
# बालकविता

अनुवाद

पद्मिनी बिनीवाले

# प्रस्तावना

'रवींद्रनाथ टागोरांच्या बालकविता' या प्रस्तुत कवितासंग्रहामध्ये श्रीमती पद्मिनी बिनीवाले यांनी गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर यांच्या निवडक बालकवितांचे बंगालीतून मराठीत केलेले अनुवाद ग्रंथित करण्यात आले आहेत.

रवींद्रनाथांच्या बंगालीतील बालकवितांचे मराठी अनुवाद करण्याचे शिवधनुष्य श्रीमती बिनीवाले यांनी सहज पेलले आहे. आजवर अनेक अनुवादकांनी रवींद्रनाथांच्या बालकवितांचे अनुवाद केले आहेत; परंतु पद्मिनी बिनीवाले यांनी केलेले हे अनुवाद आजवरच्या सर्व अनुवादांमध्ये उत्तम झाले आहेत.

'टापुर टूपुर' म्हणजे पावसाचा आवाज. पावसाच्या आवाजासाठी आपण मराठीत 'रिमझिम', त्याप्रमाणे बंगालीत 'टापुर टूपुर' हे शब्द वापरतात.

'रवींद्रनाथ टागोरांच्या बालकविता' मधील काही कवितानुवाद हे रवींद्रनाथांनी शांतिनिकेतनमध्ये प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी लिहिलेल्या कवितांचे अनुवाद आहेत, तर काही अनुवाद हे त्यांच्या 'शिशू', 'शिशू भोलानाथ' आणि 'चित्र विचित्र' या कवितासंग्रहातील कवितांचे अनुवाद आहेत.

'सहज पाठ' ही प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठीची पाठ्यपुस्तके रवींद्रनाथांनी १९३० साली, वयाच्या एकोणसत्तराव्या वर्षी लिहिली. 'क-ख-ग-घ' इत्यादी मुळाक्षरे यांत्रिक पद्धतीने म्हणायला लावण्याऐवजी रवींद्रनाथांनी ती कवितेत गुंफली. 'रवींद्रनाथ टागोरांच्या बालकविता' मधील 'मुळाक्षरे' ही कविता 'सहजपाठ'च्या पहिल्या भागातील अक्षर परिचयाचा अनुवाद आहे. श्रीमती बिनीवाले यांनी छंद आणि आशय तोच ठेवून मुळाक्षरांवरील य कवितांचा मराठीत अनुवाद केला आहे. तो इतका चांगला झाला आहे की, मराठी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही तो वापरता येईल. बालवाडीतल्या मुलांना 'मुळाक्षरे' या कवितेमधून अक्षर ओळख करवून देता येईल.

'सहज पाठ'मधील कवितांव्यतिरिक्त 'शिशू', 'शिशू भोलानाथ' आणि 'चित्र- विचित्र' या कवितासंग्रहामधील बालकवितांचे अनुवाद श्रीमती बिनीवाले यांनी केले आहेत. तेसुद्धा तितकेच सुंदर झाले आहेत.

१९०२ साली रवींद्रनाथांच्या पत्नी मृणालिनीदेवी यांचे निधन झाले. १९०३ साली रवींद्रनाथांचा 'शिशू' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहातील काही कविता रवींद्रनाथांनी आपल्या मुलांचे मन रमवण्यासाठी लिहिल्या होत्या. या कविता खूप विनोदी आणि मुलांची करमणूक करणाऱ्या आहेत, तर काही कविता मुलांबद्दल भावनात्मक आणि तत्त्वचिंतनात्मक पद्धतीने निवेदन करणाऱ्या आहेत.

'रवींद्रनाथ टागोरांच्या बालकविता' मधील 'लपाछपी', 'रविवार', 'खरं सांग हं आई मजला', 'बाबा सततच लिहितात', 'वीरपुरुष', 'पत्र' या कविता 'शिशू'मधील कवितांचेच अनुवाद आहेत.

'कोलकाता' हा कवितानुवाद 'सहज पाठ'मधीलच एका कवितेचा अनुवाद आहे. या कवितेत ज्या स्वप्नाचे वर्णन रवींद्रनाथांनी केले आहे, तसे स्वप्न त्यांना खरोखरीच पडले होते. आपली पुतणी इंदिरा देवी हिला लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी त्या स्वप्नाचे वर्णन केले आहे. नंतर त्यांनी ते स्वप्न आपल्या विद्यार्थ्यांसाठी कवितेत लिहिले आणि 'सहज पाठ'च्या दुसऱ्या भागात समाविष्ट केले. त्या कवितेचा अनुवादही तितकाच सुंदर झाला आहे.

रवींद्रनाथांच्या बालकवितांचे हे सहजसुंदर अनुवाद करून पद्मिनी बिनीवाले यांनी मराठी बालसाहित्यात व अनुवादित साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच आहे.

**-विलास गीते**

## पद्मिनी बिनीवाले यांची इतर पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १) | मिडास - कवितासंग्रह (मोठ्यांसाठी) | १९८० |
| २) | रानातला दिवा - कथासंग्रह<br>मौज, सत्यकथा व इतर मासिकांतून कथांना पूर्वप्रसिद्धी. 'नहाणं' या कथेचा 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा- खंड ११ वा मध्ये अंतर्भाव | १९७८ |
| ३) | अलांटी वेलांटी - बालगीत संग्रह (राज्य पुरस्कार) | १९७८ |
| ४) | पत्त्यांचा बंगला - बालगीत संग्रह | १९८७ |
| ५) | काबुलीवाला (रवींद्रनाथ टागोरांच्या कथांचा अनुवाद लहान मुलांसाठी) | २००५ |
| ६) | टागोरांच्या कथा (रवींद्रनाथ टागोरांच्या कथांचा अनुवाद लहान मुलांसाठी) | २००५ |
| ७) | एकला चलो - रवींद्रनाथ टागोरांचे चरित्र | २००० |
| ८) | नवनीत सुलभ मराठी लेखन व वाचन संपूर्ण (व्याकरणाचे पुस्तक) | २००५ |

# मनोगत

विश्वकवी रवींद्रनाथ टागोरांच्या बालकवितेशी माझी पहिली भेट झाली ती माझ्या शालेय जीवनात. मी बालकविता वाचण्याच्या वयात असताना इंग्रजी पाठांतराच्या स्पर्धेत मी रवींद्रनाथांची 'Authorship'(मूळ बंगाली-समालोचक-कवी रवींद्रनाथ टागोर) ही कविता म्हटली होती. या कवितेत एक छोटा मुलगा आपल्या लेखक वडिलांबद्दल आपल्या आईकडे तक्रार करत असतो. तो म्हणतो, 'लिहिणं मनासारखं जमलं नाही की बाबा कागदाचा बोळा करून फेकून देतात, त्यांना तू रागावत नाहीस. आणि मी कागदाच्या होड्या केल्या बोळा केला तर मात्र मी कागद नासतो असं तू म्हणतेस' ही कविता मला खूप आवडली होती. कविता पाठ करून घेताना माझ्या शिक्षकांनी मला रवींद्रनाथांचं छायाचित्रही दाखवलं होतं. त्यामुळं तो खट्याळ मुलगा आणि भव्य कपाळाचे टपोऱ्या डोळ्यांचे भरघोस दाढी असलेले प्रसन्न चेहऱ्याचे रवींद्रनाथ माझ्या मनाच्या तळाशी पोहोचले होते. याच अनुभवानं पुढील आयुष्यात मला बंगाली भाषा आणि रवींद्रनाथांच्या साहित्यापाशी नेऊन सोडलं.

रवींद्रनाथांचं 'शिशू' हे बालकवितांचं पुस्तक हातात पडलं तेव्हा त्यात मी प्रथम काही शोधलं असेल तर ती 'Authorship' ही कविता. ती मला 'समालोचक' या नावानं सापडली. मी अनेकवेळा 'शिशू' वाचलं. दर वाचनात या बालकविता मराठी बालकवितांपेक्षा वेगळ्या आहेत असं सतत वाटू लागलं. म्हणूनच मी काही शिशुमधील व काही इतर कवितांचा स्वैर अनुवाद केला.

ठाकूर वाड्यातल्या चंडीमंडपातील शाळा ही छोट्या रवीची पहिली शाळा. एक दिवस शिक्षकांनी 'जल पडे, पाता नडे' (जल गळे, पान हले) (ईश्वरचंद्र विद्यासागरप्रणित, वर्णपरिचय भाग पहिला) ही कविता शिकवली. त्यातल्या छंदानं छोटा रवींद्र झपाटून गेला. सारा दिवस 'जल पडे, पाता नडे' हा छंद त्याच्या मनात घुमत राहिला. खरं म्हणजे त्याच क्षणी प्रतिभेनं रवींद्रच्या मनात प्रवेश केला. रवींद्र कवीचं मन घेऊनच जन्माला आला होता. त्याला निसर्गाची विलक्षण ओढ होती. तो सकाळी उठला की प्रथम बागेत जाई. दवबिंदूंनी ओल्या झालेल्या हिरव्या गवताचा ताजा वास मनात भरून घेई. निसर्गानं पुढ्यात उघडून ठेवलेलं पुस्तक वाचत असताना त्याला कितीतरी गोष्टींचं कुतूहल वाटत राही. काल मोकळ्या असलेल्या फांद्यांवर आज फुलं उमलेली दिसतात. मधमाशी फुलातला मध घेऊन दूर उडून जाते. ताडाच्या झाडाला पानांचे पंख पसरून उडायचं असतं; पण माती त्याचे पाय घट्ट धरून ठेवते, असं त्याचं सतत निरीक्षण चालू असे. पक्ष्यांना कोणी पिंजऱ्यात कोंडून ठेवलेलं पाहिलं की, त्याचा जीव कासावीस होई. तो पिंजऱ्याचं दार उघडून त्यांना उडवून देई. पावसाळ्यात गच्चीवरून आभाळात ओथंबून आलेले ढग पाहून त्याचं मनही भरून येई. या साऱ्यातच दडली होती कविता. लहानपणापासून तो कल्पक होता. फुलांचा रस काढून त्या रंगीबेरंगी अक्षरांत कविता लिहावी असं त्याला वाटे. सुरेल आवाजाची तर त्याला उपजत देणगी होती. ही तर सारी कवितेची बीजं होती. शिवाय वडीलधाऱ्यांकडून झालेल्या संस्कारांमुळं पाकळी पाकळीनं त्याची कविता फुलत होती. म्हणून तर वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी त्यानं 'व्रीष्टी पडे टापुर टूपुर, नदेय एलो बान' यासारखी अप्रतिम कविता लिहिली. इतर मुलं एकत्र जमून वेगवेगळे खेळ खेळत तेव्हा छोटा रवी घराच्या व्हरांड्यात बसून, बाहेर टप टप पडणाऱ्या पावसाकडे पाहत मनात छंद जुळवत राही. झाडं, पानं, फुलं, पक्षी, नद्या, डोंगर, पाण्यावर तरंगणाऱ्या नावा हेच त्याचे सवंगडी होते.

रवींद्रनाथ त्यांच्या लहानपणापासून कविता करत असले तरी त्यांनी बालगीतांची रचना मात्र खूप उशिरा केली. लहानपणी वाट्याला आलेलं पोरकेपण हीच त्या कवितांमागची प्रेरणा होती. रवींद्रनाथांच्या आईचा शारदा देवींचा मृत्यू झाला तेव्हा रवींद्रनाथ अवघे चौदा वर्षांचे होते. घरातला राबता आणि नोकरांकरवी मुलांचा सांभाळ करण्याची

घराण्याची पद्धत. त्यामुळं छोट्या रवींद्रला आईचं सुख लाभलंच नाही. तिनं आपल्या हातानं त्याला कधी काऊचिऊचे घास भरवले नाहीत. कधी अंगाई गीत गाऊन जोजवलं नाही. पुढं रवींद्रनाथांच्या पत्नी मृणालिनी देवी यांचा १९०२ मध्ये अकाली मृत्यू झाला. तेव्हा रवींद्रनाथांचा मोठा मुलगा रथींद्र चौदा वर्षांचा आणि सर्वांत छोटा शमींद्र अवघा सहा वर्षांचा होता. वडिलांनी सोसलेलं पोरकेपणाचं दु:ख परत मुलांच्या वाट्याला आलं. रवींद्रनाथ अशा प्रसंगी एकाच वेळी त्यांची आई आणि त्यांच्याएवढे शिशू झाले. त्यांनी मुलांना रिझवण्यासाठी बालकविता लिहिल्या. या बालकवितांतून त्यांनी आपली मातृप्रेमाची भूक भागवून घेतली. त्यांनी 'शिशू' 'शिशुभोलानाथ' या संग्रहातील आणि इतर काही कविता लिहिल्या.

या बालकविता म्हणजे मायलेकरातला हृद्य संवाद आहे. शिशू आपल्या अनेक लीलांनी मातेचं मन रमवीत असतो, तर शिशूच्या रूपाने आपलं युगानुयुगीचं स्वप्न पुरं झालं म्हणून आईला त्याच्याबद्दल कृतज्ञता वाटते. कधी हा शिशू अनेक प्रश्न विचारून आईला भंडावून सोडतो, (प्रश्न) कधी तोच शिशू आईची समजूत घालतो. असं या मायलेकरांचे लडिवाळ नातं. हा शिशू हट्टी, खोडकर, रुसका असला तरी मनस्वी आहे. तो चाफ्याचं फूल होऊन आईशी लपंडाव खेळतो (लपंडाव), आईच्या चेहऱ्यात त्याला चंद्राचं साम्य दिसतं (दादा दादा सांग मला). सुट्टीच्या दिवशी त्याला अंगाला चाफ्याच्या फुलांची उटी लावून रानोमाळ भटकायचं असतं. गुराख्याच्या पोराबरोबर पावा वाजवत गाई वळायच्या असतात. केवड्याच्या पानाची होडी करून ती फुलांनी सजवून जळात सोडायची असते. (सुट्टी) कागदाच्या होडीवर स्वत:चं नाव लिहून ती प्रवाहात सोडायची असते. असे त्याचे छंद सुंदर असतात. सतत काही वेगळं अनुभवणाऱ्या शिशूत रवींद्रनाथांनी आपलं बालरूप पकडून ठेवलं आहे.

बालपणी आईचं सुख लाभलं नव्हतं तरीही दुरून तिच्या डोळ्यांत दिसलेलं वात्सल्य, क्वचित कधी पाठीवरून फिरलेला हाताचा मऊ स्पर्श रवींद्रनाथांच्या मनात खोल दडून होता. मोठेपणी वसंतऋतूत उपरण्यात बेलफुलं (मोगऱ्याची फुलं) बांधून हिंडताना त्या शुभ्र मुलायम फुलांच्या स्पर्शात त्यांना आईच्या हाताचा मऊसूत स्पर्श जाणवे आणि मन घायाळ होई. जन्मभर मनात जपून ठेवलेल्या त्या मातृस्पर्शाच्या-मातृप्रेमाच्या बेलफुलांची उधळण त्यांनी आपल्या बालगीतांतून केली.

हे पुस्तक छोट्या मुलामुलींच्या हातात सोपवताना मला अतीव आनंद होतो आहे. यातूनच त्यांच्यासाठी रवींद्रनाथांच्या साहित्याकडे जाणारी पायवाट उमटावी ही इच्छा!

श्री. विलास गीते यांचे बंगाली भाषेवर प्रभुत्व आहे. त्यांचा बंगाली साहित्याचा सखोल अभ्यास आहे. त्यांनी माझ्या 'रवींद्रनाथ टागोरांच्या बालकविता' या पुस्तकाला दिलेली प्रस्तावना म्हणजे मला मिळालेलं प्रशस्तीपत्रच आहे. साकेत प्रकाशनाचे श्री.साकेत भांड यांनी माझं पुस्तक प्रकाशित करण्याचं ठरवलं आणि माझं एक स्वप्नच प्रत्यक्षात आल्यासारखं वाटलं.

या दोघांचे आभार मानून मला एका स्नेहमयी नात्याला पूर्णविराम देण्याची इच्छा नाही. मी त्यांची ऋणी आहे इतकंच!

पद्मिनी बिनीवाले

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | कवितेचे नाव | कवितेचे मूळ नाव | संदर्भ | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | मुळाक्षरे | ------- | सहजपाठ- भाग १ला | ११ |
| २ | रान | ------- | सहजपाठ- भाग १ला | १८ |
| ३ | ही नाव जातसे | ------- | सहजपाठ- भाग १ला | १८ |
| ४ | बाजार | ------- | सहजपाठ- भाग १ला | १९ |
| ५ | जादू | ------- | सहजपाठ- भाग १ला | २० |
| ६ | बाळ | खोका | शिशू कवितासंग्रह | २१ |
| ७ | झाडा-ताडाचे | तालगाछ | सहजपाठ- भाग २ | २२ |
| ८ | गावातली छोटी नदी | ------- | सहजपाठ- भाग २ | २३ |
| ९ | लपाछपी | लुकोचुरि | शिशू- कवितासंग्रह | २४ |
| १० | शरद | ------- | सहजपाठ- भाग १ ला | २५ |
| ११ | कितीतरी वेळा | ------- | सहजपाठ- भाग १ ला | २६ |
| १२ | रविवार | रविवार | शिशू- काव्यसंग्रह | २७ |
| १३ | सुट्टी | छुट्टी | बांगला साहित्यपाठ- भाग १ ला | २७ |
| १४ | खरं सांग हं आई मजला | समव्यथी | शिशू- कवितासंग्रह | २८ |
| १५ | नौकायात्रा | नौकायात्रा | सहजपाठ भाग- ३ रा | २९ |
| १६ | फुले-मुले | वैज्ञानिक | शिशू-कवितासंग्रह | ३० |
| १७ | सकाळ | ------- | सहजपाठ- भाग १ ला | ३१ |
| १८ | राजाचा वाडा | राजारबाडी | शिशू- कवितासंग्रह | ३१ |
| १९ | सजा | राजा ओ राणी | सहजपाठ भाग २ रा | ३२ |
| २० | बाबा सततच लिहितात | समालोचक | शिशू कवितासंग्रह | ३३ |
| २१ | वनवास | वनवास | शिशू- कवितासंग्रह | ३४ |
| २२ | कोलकाता | ------- | सहजपाठ- भाग २ रा | ३६ |
| २३ | वृष्टी पडे टपुर टूपुर | वृष्टी पडे टपुर टूपुर | शिशू- कवितासंग्रह | ३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | प्रश्न | प्रश्न | शिशू- कवितासंग्रह | ३९ |
| २५ | नाव तिचे | ------- | सहजपाठ- भाग १ ला | ४० |
| २६ | वीरपुरुष | वीरपुरुष | शिशू- कवितासंग्रह | ४० |
| २७ | कागदाची नाव माझी | कागजरे नौका | शिशू- कवितासंग्रह | ४१ |
| २८ | पत्र | व्याकूळ | शिशू- कवितासंग्रह | ४२ |
| २९ | मला वाटते | विचित्र साध | शिशू- कवितासंग्रह | ४३ |
| ३० | समजूत | अपयश | शिशू- कवितासंग्रह | ४४ |
| ३१ | दादा दादा सांग मला | ज्योतिषशास्त्र | शिशू- कवितासंग्रह | ४५ |
| ३२ | स्वप्न | -------- | सहजपाठ भाग १ला | ४६ |
| ३३ | मास्तर | माष्टोर बाबू | शिशू- कवितासंग्रह | ४७ |

# १. मुळाक्षरे



अ
आ

छोटा बाळ करी ‘अ आ’
त्याला बोलता येईना

ऱ्हस्व ‘इ’ दीर्घ ‘ई’
कोपऱ्यात बसून खीर खाई

ऱ्हस्व ‘उ’ दीर्घ ‘ऊ’
दोघे आवळे जावळ भाऊ

इ ई

उ ऊ





# ऋ


वर मेघ बोलतो 'ऋ'
आता पाऊस होईल सुरू

# ए ऐ

वाटी घेऊन 'ए' 'ऐ'
म्हणतात मला दे दही

# ओ औ

पाढे म्हणतात 'ओ' 'औ'
पाच आणि चार नऊ



क ख
ग घ

'क ख ग घ' गाणं गाई
पाण्यावरून नाव जाई

सुंदर चित्र काढतो 'ङ'
लाल हिरवे घेऊन रंग

ङ

मिळून सारे 'च छ ज झ'
जातात घेऊन मोठं ओझं

च छ
ज झ



ञ

'भूक भूक' करतो 'ञ'
रडतो सारखा 'किञ किञ'

'ट ठ ड ढ' नाचती गोल
खांद्यावरती घेऊन ढोल

ट ठ
ड ढ





ण

मूर्धन्य 'ण' म्हणतो कसा
गोष्ट ऐका चूप बसा

'त थ द ध' चौघे भाऊ
म्हणती 'आंबे पाडायला जाऊ'
रागात बोलतो दन्त्य 'न'
म्हणा लवकर एक दोन

त थ
द ध
न





प फ
ब भ

'प फ ब भ' रानात जातात
सारा दिवस गवत कापतात

'म' चालवतो बैलगाडी
त्याची दूर आहे वाडी

म





# य र
# ल व

'य र ल व' बसून घरी
मन लावून अभ्यास करी

'श ष स' हे छत्री घेऊन
पावसामध्ये येती फिरून

शाल पांघरून घेई 'ह क्ष'
शिंका देई 'अक्ष अक्ष'

# श ष स
# ह क्ष



# २. रान



रानामध्ये मोठा वाघ
अंगावर काळे डाग

झाडावर कित्ती पक्षी
पंखांवर छान नक्षी

जळात उभा बगळा
माशावर त्याचा डोळा

मधमाशा रानभर
त्यांचं पोळं झाडावर

# ३. ही नाव जातसे

ही नाव जातसे
रोज नव्या गावाला
तेथील माणसे,
वेश नवे बघण्याला

गिरीशिखरे वरती
भिडती नीलाकाशी
दिसतीलही कोठे
शुभ्र हिमाच्या राशी

सागरापलीकडे
असेल नारळ बाग
ओळीत माणसे
जशी दिसे ती रांग

बाबा का जाती
कचेरीत कामाला?
-ते का नच जाती
रोज नव्या गावाला?



# ४. बाजार

पद्मानदी तिच्या तीरी 'लक्ष्मीगंज' वसे
शुक्रवारी बाजाराची गडबड असे

कुंभाराच्या वाड्यातून आली बैलगाडी
कुंभाराने आणलेली माठ घडा कुंडी

स्वतः कुंभारच गाडी चालवीत होता
बरोबर त्याचा भाचा 'मदन'ही होता

भाजीपाला भांडीकुंडी कपडाही भारी
कुणी विके काही, कुणी खरेदीही करी

डाळ, मूग, हरभरा, रवा, मैदा, आटा,
मुळा, वांग काळं, त्याला जरा नाही काटा

झारा, तवा, पळी छान मिळते कढई
कुणी 'परडी' वेताची घेऊनिया जाई


शहराची छत्री इथे स्वस्त मिळणार
थंडीसाठी घेई कुणी शाल उबदार

गाड्या भरून भरून गूळ येई किती
त्याच्यावरती सारख्या माशा घोंगावती

इथे एका कोपऱ्यात बसे अंध कोणी
भिक्षा मागतसे, गोड गाऊनिया गाणी

घाटावर गावातली पोरे जमलेली
नदीमध्ये डुंबताना मस्ती चाललेली

# ५. जादू



काल फांदी होती नुस्ती
आज फुले बहरली
माळीदादा सांगा मला
अशी जादू कोणी केली?

येती फुले झाडातून
ये जा त्यांची फांदीवर
घेती तोंडे झाकुनिया
कुठे आहे त्यांचे घर?

कान उंच उभारून
झाडाआड दडतात
हाक देई वेळूबन
तेही कसे ऐकतात?

स्वच्छ तोंड धुऊन ती
पटकन आली आज
किती छान दिसतसे
रंगीत हा त्यांचा साज


मातीमध्ये असे काहो,
माळीदादा, त्यांचे घर?
दादा म्हणे, "घर त्यांचे
आकाशात असे वर

नानारंगी मेघ किती
येती जाती नभातून
हवा प्रकाशही येई
त्याच गुप्त दारातून !"

# ६. बाळ

खेळता खेळता
अलगद अलगद
बाळ घेते डोळे मिटून
डोळ्यांत झोप येई कुठून ?
परीची कथा
कथेत छान
गावात आहे
हिरवं रान
रानाची छाया पडते दाट
चमचम काजवे लखलख थाट
रानात एक
सुंदर तळे
तळ्यात दोन
कमळफुले
फुलांच्या कोषात झोपेचं घर
तेथूनच ती येते तर !
बाळाच्या ओठी झोपेत हसू
मधूनच कसे लागते दिसू?
ढगाला लागे
चंद्राचा हात
दवाचे थेंब
फुलाफुलांत
त्याचे होऊन गोड हसू
बाळाच्या ओठी लागते दिसू!

# ७. ताडाचे झाड



झाड ताडाचे राहाते
उभे एका पायावर
दूर सारून साऱ्यांना
सर सर जाई वर

मनी त्याच्या एक आस
खूप जाऊनिया वर
मेघ सारे भेदू, पण
पंख कसे मिळणार?

मग काय करीतसे
आपल्याच माथ्यावर
इच्छा देई पसरून
गोल गोल पानांवर

मनातच म्हणतसे
'सुटत हे नाही घर
उडायला येत नाही
कसले हे पंख तर !'

सारा दिन त्याची पाने
थरथर वाऱ्यावर
झरझर करतात
वाटे त्याला जावे वर

कल्पनेत उडताना
झरकन वर जाई
मारी फेरी आकाशात
तारकांची भेट घेई

संध्याकाळ झाल्यावर
हवा होई मंद मंद
परतून येई घरी
उडायचे करी बंद

करी मनात विचार
माझी आई माती तर
माझ्यावर करी प्रेम
तिच्यातच माझे घर


# ८. गावातली छोटी नदी

गावातली छोटी नदी
वळतच जाई
वैशाखात तिचे जळ
घोट्यावरी येई

गाय ओलांडते नदी
तशी बैलगाडी
दोन्ही उंच काठावर
वसलेली वाडी

दलदल नाही; बैल
झिक झिक चाले
एका तीरी काशबन
शुभ्र शुभ्र फुले

साळुंक्यांचा थवा बोले
किलबिले राई
मध्यरात्रीला भेसूर
सुरू कोल्हेकुई



पलीकडे तालवन,
आंबराई दाट
छायेमध्ये वाडी
तिथे जाते पायवाट

आषाढात ढग, नदी
धावतच सुटे
जळी गढूळ तांबड्या
कोलाहल उठे

आनंदाच्या चित्कारांनी
दुमदुमे काठ
वर्षाऋतू उत्सवाचा
सुरू होई थाट

# ९. लपाछपी

मी फूल सुगंधी चाफ्याचे होऊन
फांदीवर, आई, पानाआड दडेन.
तू 'बाळा' म्हणुनी देशील हाक जरीही
मी हसेन दुरुनी; बोलणार परि नाही

तू केस मोकळे पाठीवर सोडून
चाफ्याच्या खाली येशील स्नान करून
मग देवपूजेस्तव जाशील घाईघाई
म्हणशील, 'कोठुनी गंध येतसे बाई !'

तू बसता पोथी रामायण वाचाया
खिडकीतून त्यावर येईल चिमणी छाया
कळणार तुला परि मुळीच काही नाही
हा गंध नि छाया बाळाचीच असे ही

हा खेळ फुलाचा सोडून संध्याकाळी
मी झाडावरूनी हळूच येईल खाली
मग सतावीन मी गोष्टीसाठी तुजला
"होतास कुठे तू" नको विचारू मजला

# १०. शरद

येतसे शरद थंड शीत स्पर्श
हवेत  गारवा आला
पहाट प्रहरी तृणपात्यांवरी
दवाची मौक्तिकमाळा
आवळ्याचे वन कापे,
जणू त्याचे हृदय लागले झुरू
कळून आलेले पानगळीचा हा
समय झालेला सुरू
प्राजक्त कळ्यांनी गच्च भरलेला
तगर फुलून आला
मालतीवरती मधमाशी मध
शोधते दोन्हीही वेळा
होऊ लागलेला पावसाचा अंत
मेघही विरळ तसे
वाऱ्याच्या संगती तरंगत जाती
स्मरण कामाचे नसे
तळ्यातले जळ करी झुळझुळ
तीराला फुलेच फुले
हिरवी पिवळी धान्याची शेते ही
त्यातून पवन खेळे
बघावे तिकडे सोनेरी प्रकाश
धरेला आनंद झाला
उगवेल वनी नवरात्र रवी
पूजेचा सोहळा आला

# ११. किती तरी वेळा

किती तरी वेळा फूल
करी विचार
जर मिळे उडायला
मजा येणार !

एके दिनी फुलाला त्या
पंख फुटले
झाले  फुलपाखरू ते
दूर उडाले

दीपकाचा प्रकाशही
म्हणे मनाशी
'उडावया आले तर
खुशीच खुशी

प्रकाशाला चिमुकले
पंख फुटले
काजव्याला कधी कुणी
घरी कोंडले ?

तलावाचे जळ गप्प
झुरे मनात
'हाय उडती पाखरे
कशी ती नभात!'



निळे मऊ धुके त्याचे
पंख की लेवून
गेले जळ आकाशात
होऊन जलद

वाटे मज घोडा व्हावे
दुडके दौडावे
माशापरी दिनरात
पोहाते जळात

पक्षी होऊनिया उंच
नभी उडावे
होत नाही कोणीच मी
असे का व्हावे ?

## १२. रविवार

सोम, मंगळ नि बुध येती घडी घडी
असेल का त्यांच्या घरी मस्त हवागाडी

आई उशीर का करी रविवार भारी
हळू हळू मागे मागे मागे रेंगाळते स्वारी

त्याचे घर आकाशात आहे का ग दूर ?
रविवार वाटतसे गरिबाचे पोर

रविवार निघायची का ग करी घाई
अर्ध्या तासामध्ये त्याचा तास पुरा होई

सोम, मंगळ साऱ्यांची काळी काळी तोंडं
मुलांसवे वेळोवेळी चाले भांडाभांड

शनिवारी झोपतात दमलेली मुले
उजाडता रविवार हसू त्यांना आले

१३०२

## १३. सट्टी

मेघातून वर सूर्यबिंब आले
पावसाळी ढग दूर पांगलेले
आनंदाने आता गाऊ नाचू सारे
नकोच पुस्तक पाटी
मिळाली शाळेला सुट्टी

करायचं काय सुचतच नाही
आनंदानं मन बावरून जाई
हरवून वाट कोणी वनी जाई
साऱ्यांची जमली गट्टी
मिळाली शाळेली सुट्टी

गुराख्याच्या संगे सांभाळू या धेनू
फिरू रानीवनी वाजवीत वेणू
लुटुनिया फुले चाफ्याची लावू या
अंगाला पराग उटी
मिळाली शाळेला सुट्टी

केवड्याचे पान त्याची करू होडी
बकुळ फुलांनी सजवूया थोडी
सोडताच जळी डुलत डोलत
जाईल दूरच्या काठी
मिळाली शाळेला सुटी

पुणे महानगरपालिका
गरवारे बालभवन
पुणे

# १४. खरं सांग हं आई मजला

बाळ न होता झालो असतो
मी जर इवले भू ऽ भू ऽ
माझ्यासाठी काय ग आई
केले असते मग तू?

जवळ घेऊनी हळूच फिरवुनी
पाठीवरती हात
भरवलास असतास मला का
ताटलीतला घास

खरं सांग हं आई मजला
फसवायचं नाही
बाळ न होता झालो असतो
मी जर दुसरे काही



म्हणालीस तू असतीस मजला
'तोंड त्यात नच घालू
कुणास ठाऊक कुणी आणले
हे कुत्र्याचे पिल्लू?'

मांडीवरती तुझ्या कधीही
मी बसणारच नाही
ताटलीतला घास तुझ्या मज
भरवू नकोस मुळेही

खरं सांग हं आई मजला
फसवायचं नाही
बाळ न होता झालो असतो
मी जर दुसरे काही

बाळ न होता झालो असतो
पोपट हिरवा मिठू ऽ
माझ्यासाठी काय ग आई
केले असते मग तू ?

जवळ तुझ्या मी आलो असता
पसरुनि हिरवे पंख
भीती वाटली असती तुजला
मारणार मी डंख

म्हणालीस ना असतिस मजला
'गलिच्छ किती पाखरू
सोडुनि द्या रे त्या बाहेरी
कुणीही नका त्या धरू'

आजपासुनी तुझ्याबरोबर
गट्टी फूऽ घेणार
एकटाच मी रानामध्ये
दूर दूर जाणार

# १५. नौकायात्रा



छोटी नौका घेऊन आई
सफरीला मी जाईन
दहा नद्या अन् सागर साती
पार करोनी येईन

रडायचे तू मुळीच नाही
बसून घराच्या दारात
जात नसे मी चौदा वर्षे
रामापरि वनवासात

राजपुत्र मी होऊन आई
परतून येईन डौलात
माणिकमोती सोने लुटुनी
भरून आणीन नौकेत

मी न एकटा, माझ्यासंगे
आशूलाही नेईन
एकटाच मी दूर एवढ्या
सफरीसाठी जाईन

भल्या पहाटे घालू आम्ही
नौका अमुची पाण्यात
असू दुपारी भटकत आम्ही
दूर देशच्या राज्यात

सायंकाळी आम्ही दोघे
घरात येऊ परतून
तुझिया मांडीवरती बसुनी
गोष्टी तुला मी सांगेन

# १६. फुले - मुले

सुटतो वारा गुरगुरती ढग
आषाढाच्या सरी
फुले कितीतरी उमलुनी येती
मातीमधुनी वरी

लाल गुलाबी निळी जांभळी
सुंदर सुंदर फुले
मला भासती ती तर आई
आम्हासारखी मुले


दप्तर पाटी घट्ट पकडुनी
धरती बगलेमधे
खाष्ट गुरुजी, शाळा त्यांची
भरते जमिनीमध्ये

'खिडक्या दारे बंद करोनी
अभ्यासाला बसा'
गुरुजी म्हणती, 'खेळाचा हा
छंद नको रे असा'

वैशाखाचे ऊन तापता
दुपार त्यांची असे
ज्येष्ठ आणखी आषाढातही
संध्याकाळच दिसे

सो सो वारा ढगांत तंटा
वीज कडकडे जरी
ती तर घंटा सुटते शाळा
लगबग येती वरी

मातीमधल्या शाळेमधुनी
नभातल्या त्या घरी
करिती 'ये-जा' आनंदाने
मौज तयांची खरी.





## १७. सकाळ

रात्र काजळी निघून गेली
प्रकाश टाकी तिजसी धुऊन
झोप संपली पूर्वदिशेची
उषा सजोनी बघे हसून

चांदोबाला कळतच नाही
हाक मारली कुणी कुठून
भिऊन झरझर तोही गेला
शोधीत वाटा, दूर निघून

तारा ज्योती घेऊन बसल्या
जागत साऱ्याजणी मिळून
वाट चुकोनी भूवर आल्या
जुई मोगरा फुले बनून

फिरतो वारा दिशादिशांतून
किलबिल पक्षी घरट्यांतून
ढगाढगांवर रंग अनोखे
उठती लहरी जळामधून

## १८. राजाचा वाडा

कोठे आहे खेळातला राजाचा वाडा
सापडेल का कोणाला? बातच सोडा
छत आहे सोन्याचे नि चांदीच्या भिंती
चढे शिडी हस्तिदंती माडीवरती
सात महालात राही लाडकी राणी
गळा मोतीमाळा घाली रत्नांचे मणी
रत्नमाणकांचा तिचा सुंदर वेश
लांबसडक सोनेरी कुरळे केस
राजकन्या पंखपरी झोपाळू फार
आई, फक्त मलाच ती ओळखणार
स्पर्श करता सोन्याची घेऊन छडी
जागी होई, मनाशीच हसते वेडी
शुभ्र दात ओठ तिचे गुलाबी किती
हसताना ओघळती माणिकमोती
कोठे आहे असा वाडा ऐक ना आई
तुळशीचे रोप जिथे डुलत राही
भिंतीवर कोपऱ्यात सावली पडे
तिथे बसायला मला फार आवडे
जेव्हा आई नदीवर स्नानाला जाशी
तिला भेटण्याला स्वारी जातसे खाशी
गुपित हे माहीत ग कोणाला नाही
मी फक्त मनीमाऊला घेऊन जाई

# १९. सजा

एक होता राजा त्यानं
केली मला सजा
दुरूनच बघतसे,
सारी माझी मजा

गेलो होतो रानात मी
भल्या पहाटेला
कसे नाचत घुबड
तेच पहायला

डाळिंबाच्या झाडावर
चढावया गेलो
कडाकडा तुटे फांदी
मीही खाली आलो

राजा मग माझ्यावर
खूप रागावला
पाठोपाठ शिक्षेचाही
बेत रचलेला

'बागेमध्ये मुळीच मी
नाही खेळायचं
कोणासंगे जत्रेलाही
नाही जावयाचं

गोडधोड मुळीसुद्धा
नाही खावयाचं
अशी शिक्षा दिली मला
काय सांगायचं !

एक होती राणी तिचं
सारं मीही मानी
शिक्षा ऐकताच झाली
दु:खी मनोमनी

बोललीच नाही काही
जेवलीही नाही
माझ्यापाशी राही,
नाही गेली जत्रेलाही

दाटुनिया आला गळा
डोळे लाल लाल
अशी राणी कोण होती
तुम्ही ओळखाल

कोण राजा ज्यानं सजा
केली होती मला
ओळखाल तुम्हीही ते
सांगू मी कशाला !

# २०. बाबा सततच लिहितात

बाबा सततच लिहितात
'वाच' आईला म्हणतात
पांढऱ्यावरी काळे करूनी
कागद नासत बसतात

लिहिती ते जे कळत नसे
आई तुज का कळत असे?
कळले आहे तुजला काही
तुझ्या मुखावर दिसत नसे!

सांगतेस तू कथा तशी
लिहिता त्यांना येईना
अन् आजीची गोड कथा
स्मरण तिचे तर होईना

स्नानासाठी पुन्हा पुन्हा
का ग आठवण करतेस?
गरम करूनी जेवण त्यांची
वाट कशाला बघतेस?

खोलीत जाता मी त्यांच्या
पाठीत घालून तू रट्टा
म्हणशी मजला 'उठ इथून'
किती खोडकर हा कार्टा

चुरगाळून कागद आई
बाबा तर करिती बोळा
मी करिता सुंदर होड्या
म्हणशी 'हा वेडा चाळा'

बाबा सततच लिहितात
'वाच'आईला म्हणतात
पांढऱ्यावरी काळे करूनी
कागद नासत बसतात.

# २१. वनवास

रामापरि मज धाडतील जर बाबा वनवासाला
मी ज़ाऊ शकणार न आई असे वाटते तुजला?

मला न माहीत दण्डक वन ते कोठे कुण्या दिशेला
संपतील कधी चौदा वर्षे तेही न कळे मजला
लक्ष्मणापरी देशील जर तू छोटा भाऊ मजला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

झाडाखाली बांधू आम्ही पर्णकुटी गवताची
नदी वाहती असेल तेथे खळखळत्या पाण्याची
किनाऱ्यावरी असेल नौका पैलतिरी जाण्याला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

गळयात आणि जटेत घालू रानफुलांच्या माळा
कंदमुळे अन् बोरे मिळतील शबरीची आम्हाला
कमळाच्या पानावर गोडी येईल आहाराला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

कदंबातळी रोज दुपारी बसून घुमवू पावा
फांदीवरती मोर पिसारा झुलवित तिथे बसावा
घास तृणाचा बागडणाऱ्या हरिणाच्या बाळाला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

सहवासाला ऋषीमुनी अन् सोबत हनुमानाची
रक्षण करण्या असेल सेना वाली, सुग्रीव यांची
सीता नाही रावण नाही भीती हवी कशाला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला



संध्याकाळी घरट्यामध्ये पक्षी येती परत
तुझी आठवण दाटुन येईल आई मम हृदयात
उजळतील मग संध्यातारा चढत्या अंधाराला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

माथ्यावरती बांध जटा, दे हाती धनुष्यबाण
शिकवशील ना रामसीतेच्या वनवासाचं गाणं
म्हणूनी आई देशील ना गे छोटा भाऊ मजला
आनंदाने दोघे मिळुनी जाऊ वनवासाला

# २२. कोलकाता

एका रात्री मजेदार
स्वप्न बघितले
'नीट बघ', 'नीट बघ'
कुणी सांगितले

बघू जाता कोलकाता
धावूं लागलेले
खांब आणि तुळयांची
ठाकाठोठी चाले

गेंड्यापरी विटांचाही
ढीग चालतसे
दारे खिडक्यांची रांग
दोन्हीकडे दिसे

रस्ता चाललेला जसा
लांब अजगर
त्याच्यामागे ट्रॅमगाडी
जाई झरझर

बाजारात दुकानांच्या
चालू उठाबशा
एकावर एक गच्च्या
पडतात कशा

'हावड्याचा' नाकतोडा
उड्या मारू लागे
'हॅरिसन' रोड त्याच्या
धावे मागे मागे

राणीचा मनोरा झुले
जसा वेडा हत्ती
सोंड उंच करुनिया
उडवितो माती

छोटी झाली शाळा माझी,
पळे छात्रगण
छोटी अंकलिपी आणि
छोटे व्याकरण

भिंतीवर नकाशाची
चाले फटफट
पाखरांच्या पंखांचीच
जणू झटापट

घंटा वाजे ठण्णू ठण्णू
हले सारखीच
कुणी काय म्हणे तिला
नाही कळतच
लोक सारे म्हणतात,
‘थांब रे थांब ना
कुठे होता कुठं जाशी
काय वेडेपणा’

कोलकाता ऐकेचना
थांबेचना तरी
खांब भिंती वेड्यापरी
नाचतात सारी

विचार मी करीतसे
चिंता नाही मला
जातो तर जाऊ दे ना
त्याला मुंबईला

दिल्ली लाहोरला जाई
किंवा आगऱ्याला
पायी चढाव ते घाली
पगडी डोक्याला

कोलकाता गेले जरी
परदेशी थेट
घालावेच लागतील
बूट, हॅट कोट

कोठल्याशा आवाजाने
जाग मला येते
बघितले कोलकाता
जागेवर होते.

# २५. नाव तिचे

नदी छान
नाव तिचे आहे 'मोतीचूर'
तुडुंबले जळ,
हंस तरंगती वर
काठावर बकध्यान,
खंड्या दूर उडे
मासा लाल निळा
जळी झुपकन दडे
झिमझिम पावसाची
लागलेली धार
भातरोपे पाण्यामध्ये
बुडालेली पार
गुरांसवे परतली
गुराख्याची मुले
जाळ्यामध्ये मासे,
कोळी घराकडे आले
आभाळात तरंगती
ढग हवेवर
शेवाळे हिरवे हले
लाल पाण्यावर



# २६. वीरपुरुष

आई  जर का गेलो आपण कुठे प्रवासा दूर
पालखीत तू बसशील आणि मी घोड्यावर स्वार


निर्जन रस्ता झाडाखाली पाचोळा पडलेला
दिवस संपला आणि निघाला रवीही मावळतीला

काळोखाचे मनात तुझिया भय दाटून येणार
कुठून आलो प्रवासास या असे तुला होणार

कभिन्न काळे डाकू येता धावून अंगावरती
भिऊ नको मी वार सपासप करीन त्यांच्यावरती

जिंकून येता असेन मीही रक्ताने भिजलेला
कुशीत घेऊन 'वीरपुरुष' ग म्हणशील ना तू मजला

# २७. कागदाची नाव माझी



कागदाची नाव माझी मी प्रवाही सोडितो
नाव माझे गाव त्यावर मी खडूने रेखितो

मोठमोठे शब्द देतो रेघ त्यांना नीटशी
पाहणाऱ्याला कळे ही नाव येथे ये कशी

पारिजाताची सुगंधी छान पुष्पे ठेवुनी
सोडितो नौका जळी ती जातसे सांभाळुनी

ती गती घेता जळाची एकटा मी राहतो
दूर जाई ती तिला मी सारखे न्याहाळितो

मेघ देती साथ गाती पाखरे रानीवनी
ऊन सोनेरी, जळी ती दंग होई नर्तनी

मी घरी जाता मिटूनी घट्ट डोळे घे किती
सारखी डोळ्यांपुढे ये नाव माझी डोलती

रात्र होता कुट्ट काळी फार भीती वाटते
हा किनारा तो किनारा ती कुठे का शोधते?

# २८. पत्र

का ग आई बसलीस दारात अशी
विसरून तू ग सारे गेलीस कशी
का ग घेत नाहीस तू जवळ मला
लाडका मी आहे तुझा सांगना मला
पावसाचे थेंब येती भिजले अंग
पाठीवर आज केस मोकळेच का ग?
दादा शाळेतून आता येईल ना घरी
घड्याळाकडे लक्ष नाहीच तरी
नाही पत्र बाबांचे का अजून आले
दुःख सांग काय त्याचे म्हणून झाले?
आई आहे पोस्टमन लबाड मोठा
त्याच्यापाशी आहे कित्ती पत्रांचा साठा
वाटतसे पत्र रोज सऱ्यांच्या घरी
तुला पत्र देत नाही असे का करी?
आता लिहीन पत्र मी छानसे एक
नसेल ग त्यात आई एकही चूक
नको पोस्टमन पत्र देईन मीच
नको दाखवू कोणाला एकटी वाच
हसलीस का ग माझे चुकले काही ?
बाबांसारखे लिहिता येणार नाही?

# २९. मला वाटते

शाळेला मी निघतो तेव्हा
शिरतो गल्लीत फेरीवाला
काचबांगड्या तशा बाहुल्या
'घ्या घ्या' म्हणतो तो साऱ्यांना

हवे तसे तो भटकत असता
नसते त्याला कसली घाई
या गल्लीतून त्या गल्लीतून
आनंदाला भरती येई

मला वाटते नकोच शाळा
घड्याळ पुस्तक विसरून जावे
गल्लोगल्ली विकत खेळणी
फेरीवाला बनून फिरावे

शाळेमधुनी माखून शाई
परतून येता संध्याकाळी
कुदळ घेऊनी बागेमध्ये
खणताना मज दिसतो माळी

मला वाटते माळी होऊन
बागेमध्ये काम करावे
झकपक कपडे कशास मजला
खेळत मातीमध्ये राहावे

रात्र जराशी होऊ लागता
आई म्हणते 'झोपा सारी'
खिडकीमधुनी दिसतो मजला
लाठीधारी पहारेकरी

रस्त्यावरच्या अंधारात
दिवे गॅसचे लुकलुकतात
हातामधली फिरवत काठी
गस्त घालितो कशी ऐटीत

मला वाटते पहारेकरी
होऊन आपण निवांतवेळी
अंधारातून देत फिरावे
'आलबेल'ची उंच आरोळी

# ३०. समजूत

बाळा तुझ्या डोळ्यांमध्ये
पाणी का रे आलं ?
कुणी तुला बोललं का
कुणी काही केलं ?

लिहिताना गालावर
लागली का शाई
'गचाळ, गबाळ्या' असे
म्हणे कुणी काही?

जाऊ दे रे, चंद्रावर
नसतो का डाग?
कशाला रे यावा मग
त्याचा तुला राग?

खेळताना का रे तुझा
फाटला सदरा?
म्हणुनी का रडत तू
परतशी घरा ?

म्हणाले का तुला कोणी
'गरीब भिकारी'?
ढगामधूनच ना रे
रवी येतो वरी !

नको ऐकूस रे जरी
कोणी काही बोले
दाखवती दोष तुझे
वेडी सारी मुले

आवडते फार तुला
मिठाई खायला
'खादाड' ती म्हणतात
म्हणुनी का तुला?

लाडका आमुचा, आम्हा
आवडसी फार
मग सांग, आम्हाला ती
काय म्हणणार?

# ३१. दादा दादा सांग मला

विचारतो मी दादाला
"एवढेच तू सांग मला
संध्याकाळी बागेत
कदंबतरूच्या फांदीत
अडकून बसल्या चंद्राला
येते का पकडायाला?"
ऐकून ते दादा हसला
"अरे सोनुल्या" म्हणे मला
तुझ्यासारखा वेडा तू
दुसरा नाही बघितला
किती दूर तो चंद्र तया
येई का स्पर्शायाला ?"
मी म्हटले,
"दादा अगदी
कळतच नाही तुला कसे
खिडकी उघडूनी बघणारी
का रे आई दूर असे ?"
दादा म्हणतो,
"सांग मला
त्या चंद्राला पकडाया
देईल का रे कुणी तुला
मोठे जाळे आणुनिया"
मी म्हटले मग दादाला
"चंद्र असे तर इवलासा
कशास जाळे हवे मला
मुठीत आणीन धरून असा"
दादा म्हणतो,
"जरी कधी
अशक्य झाले शक्य तरी
चंद्र उतरला भूमीवरी
दिसेल मोठा कितीतरी?"
मी म्हटले मग दादाला
"ज्ञान तुझे रे व्यर्थ असे
अभ्यासाला अर्थ नसे
भलते काही मनी वसे

जवळी घेऊन कधी आई
"कुरवाळून पापा घेई
मोठे होऊन वदन तिचे
झाकून का मम मुख जाई?"
म्हणतो दादा
"मूर्ख मुला
समजावू मी कसे तुला?
तुझ्यासारखा वेडा तू
दुसरा नाही बघितला."

# ३२. स्वप्न

दिवसाच्या मागे रात्र- चक्र चालले
कुणी पाहिले का स्वप्न सत्य झालेले

धरू येई छोटा काका दूर मी पळालो
पंख पसरून उंच उडू लागलो

'थांब थांब' म्हणे काका 'ये ना रे तू खाली
शाळेमध्ये जाण्याची की वेळ ही झालेली

'रागावू नको हो काका', त्यांस म्हणे मी
'आकाशात आल्यावर ढग झालो मी'


शोधायचे इंद्रधनू कुठे लपले
डोक्यामध्ये प्रकाशाचे फूल घातले

सात सागराच्या पार जावे वनात
बरसून यावे असे आहे मनात

इतकेच म्हणता मी काय घडले
कडकड दात माझे वाजू लागले

कापू लागे अंग आई नाही जवळ
बिछान्यात लोळत मी होतो केवळ

# ३३. मास्तर



मी मास्तर होऊन शाळा खेळत राही
विद्यार्थिनी बनुनी द्वाड मांजरी येई
छडी नुसती जवळी मार न शिक्षा तिजला
जरी रोजच होई उशीर तीज शाळेला

तीज मनापासुनी नकोच असते शाळा
अन् अभ्यासाचा रोजचाच कंटाळा
मी शिकवू जाता तिजला 'अ आ इ ई'
देऊन जांभया जिभल्या चाटत राही

मी घोकू लागता 'अ आ इ ई उ ऊ'
तरी हिचे सदाचे चालू असते 'म्याऊ'

वाईट बोलणे खोटे, कारणे चोरी
मी सांगत असता मिश्या पुसतसे स्वारी
मी शिकवत असता असेच काहीबाही
ती हळूच आपुले कान मिटोनी घेई

उंदीर कुठे तीज दिसता, रागे रागे
अभ्यास सोडुनी धावत जाई मागे
मी घोकत असता 'अ आ इ ई उ ऊ'
आवाज कुठोनी तरी येतसे 'म्याऊ'

रवींद्रनाथ टागोरांनी भारताला साहित्याचे पहिले पारितोषिक मिळवून दिले. त्यांचा गीतांजली हा ग्रंथ विश्वसाहित्यात सर्वदूर पोहोचला.

रवींद्रनाथ ह्यांनी बालकांसाठी विपूल लेखन केले आहे. त्यातील बालकविताही फार महत्त्वाच्या आहेत.

रवींद्रनाथांनी आयुष्यभर लेखन केले; पण मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या ह्या कविता आणखी वेगळ्या आहेत. वयाच्या एकोसत्तराव्या वर्षी प्राथमिक शाळांच्या मुलांसाठी त्यांनी बालकविता लिहिल्या. ह्या कविता म्हणजे मुळाक्षरे शिकणाऱ्या मुलांसाठी जणू सहजपाठच आहे.

श्रीमती पद्मिनी बिनिवाले यांनी केलेला हा सहज सुंदर अनुवाद चांगला उतरला आहे.

रवींद्रनाथांच्या या संग्रहातील लपाछपी, रविवार, खरं सांग हं आई मजला, बाबा सततच लिहितात, वीरपुरुष, पत्र ह्या सर्वच बालकविता मुलांना आवडतील.

ISBN 978-81-7786-631-5
9788177866315
₹ 40/- बालकविता
A.H.W. Saket Series

साकेत प्रकाशन
www.saketpublication.com